जिल्हा परिषद, नंदुरबार
प्राथमिक शिक्षण विभाग,
मुख्य प्रशासकीय इमारत,टोकरतलाव रोड,
नंदुरबार-४२५४१२(महाराष्ट्र)

ईमेल-ssanandurbar१@yahoo.co.in दुरध्वनी क्र. (०२५६४)२१०२४०

क्रमांकः-जिपनं/प्रा.शि/आस्था-१/262/२०२३ दिनांकः- १५/०५/२०२३

**वाचा :** १)महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा ( सेवाप्रवेश) नियम १९६७ च्या नियम ६(८)
२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था-१४ दि.०७/०४/२०२१
३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग,शासन पत्र क्र.जिपब/२०२२/प्र.क्र.२९ (भाग-२)आस्था १४ दि.२४/०२/२०२३
४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडुन जिल्हा तर्गत बदली झालेल्या शिक्षकांची प्राप्त यादी दि.२५/०३/२०२३
५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग,शासन पत्र क्रजिपब/२०२२/प्र.क्र. २९ (भाग-२)आस्था १४ दि.०४/०५/२०२३

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवाप्रवेश अधिनियम १९६७ च्या नियम ६ (८) नुसार, जिल्हा परिषद नंदुरबार अधिनस्त कार्यरत असलेल्या खालील परिशिष्टात नमुदकेलेल्या शिक्षकांची संदर्भ क्र.०२ महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः जिपब- ४८२०/प्र.क्र. २९०/आस्था- १४ दि.०७/०४/२०२१ मधील तरतुदी नुसार संगणकीय ऑनलाईन प्रणालीव्दारे सन २०२२-२३ मध्ये जिल्हांतर्गत बदल्या झालेल्या आहेत. संदर्भ क्र.३ नुसार जिल्हांतर्गत बदली झालेल्या शिक्षकांना दि.०१/०५/२०२३ ते दि.१५/०५/२०२३ पर्यंत कार्यमुक्तीचे प्रशासकीय आदेश निर्गमित करावेत व कोणत्याही परिस्थितीत दि.१६/०५/२०२३ ते दि.३१/०५/२०२३ या कालावधीत अशा शिक्षकांना प्रत्यक्ष कार्यमुक्त करण्याबाबत कार्यवाही करावी असे निर्देश आहेत.

त्याअर्थी, मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार मला प्राप्त अधिकारांचा वापर करुन संदर्भ क्रमांक ०४ मधील प्राप्त यादीतील ज्या शिक्षकांची जिल्हांतर्गत बदली झालेली आहे, अशा शिक्षकांना त्यांनी पसंतीक्रमामध्ये नोंदविलेल्या ठिकाणी जिल्हांतर्गत बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरिता दि.३१/०५/२०२३ रोजी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

**परिशिष्ठ**

| अ.न. | बदली संवर्ग | शिक्षकाचे नाव | तालुका | सध्याची शाळा | पदस्थापना दिलेली शाळा | तालुका |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| बदली झालेल्या शिक्षकांची संवर्गा नुसार यादी सोबत जोडलेली आहे. | | | | | | |

**अटी व शर्ती :-**

१) वरिल परिशिष्ठातील बदली झालेले शिक्षक हे बदली झालेल्या शाळेतुन दिनांक ३१/०५/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी कार्यमुक्त होतील व दि.३१/०५/२०२३ रोजीच मध्यानोत्तर प्रत्यक्ष बदली झालेल्या शाळेवर हजर होतील.
२) सदरच्या बदलीस पदग्रहण अवधी व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
३) बदली आदेशातील शिक्षकांनी या आदेशासोबत बदली पोर्टलवरुन प्राप्त झालेला संगणकीय बदली आदेश जोडुन पदस्थापनेच्या ठिकाणी उपस्थित होणे बंधनकारक राहिल.
४) संबंधित शिक्षकांनी केलेल्या विनंतीप्रमाणे व त्यासाठी सादर केलेली आवश्यक कागदपत्रे सत्य आहेत असे गृहीत धरुन सदर बदली करण्यात आलेली आहे.
५) जिल्हांतर्गत बदली पोर्टलवर भरलेली माहिती कोणत्याही वेळी चुकीची आढळुन आल्यास संदर्भ क्र. २ मधील ५.१०.५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.
६) बदली रद्द बाबत राजकीय व इतर दबाव तंत्राचा वापर केल्यास संदर्भ क्र. २ मधील ५.३ चे नमुद तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

15/5/2023

(रघुनाथ गावडे )भाप्रसे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नंदुरबार

**प्रतः- माहिती व कार्यवाहीस्तव रवाना.**

१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांना माहितीस्तव सादर.
२) संबधित गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
३) संबधित गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती योग्य त्या कार्यवाहीस्तव.

२/-सदर यादीत दरम्यानच्या कालावधीत मुख्याध्यापक पदोन्नती, सेवानिवृत्त, स्वेच्छा निवृत्त, निलंबीत झालेल्या शिक्षकांची नावे असल्यास त्यांना कार्यमुक्त करण्यात येऊ नये.

४) संबधित शाळा मुख्याध्यापक यांना कळविण्यात येवून संबधितास कार्यमुक्त व रुजू करुन गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे अहवाल सादर करणेसाठी.
५) संबधितास.